महाराष्ट्र टाइम्स
बुधवार, २१ मे २०२५

1 Page

# एक पालिका, लाख तक्रारी

## महापालिकेकडील नागरी समस्यांची संख्या सव्वा लाखांच्या पार


## सन २०१५च्या तुलनेत २०२४मध्ये ७० टक्क्यांनी वाढ

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

घनकचरा व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण, पाणीपुरवठा, मलनिःसारणासह अन्य सुविधांसाठी मुंबई महापालिकेकडून वर्षाला हजारो कोटींची तरतूद केली जाते. मात्र ही तरतूद करूनही नागरी समस्या 'जैसे थे'च राहात आहेत. या समस्यांविषयी मुंबईकरांनी सन २०२४मध्ये तब्बल एक लाख १५ हजार ३९६ तक्रारी मुंबई महापालिकेकडे केल्या आहेत. सन २०१५मध्ये ६७ हजार ७७३ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे २०१५च्या तुलनेत सन २०२४मध्ये यात ७० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

प्रजा फाउंडेशनने मंगळवारी सादर केलेल्या अहवालात मुंबईतील नागरी समस्यांच्या तक्रारींत वाढ झाल्याचे नमूद केले आहे. मुंबईकरांनी केलेल्या प्रदूषणविषयक तक्रारींत सन २०१५च्या तुलनेत सन २०२४मध्ये ३३४ टक्क्यांनी तर, अनधिकृत मालमत्तांच्या तक्रारीत ७४७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. घनकचऱ्याशी संबंधित तक्रारींमध्ये ३८० टक्क्यांनी आणि पाण्यासंदर्भातील तक्रारींत ८८ टक्क्यांनी वाढ आहे.

प्रदूषण, घनकचरा, शाळा, मलनिःसारण, उद्याने, रस्ते आदींविषयी तक्रारी आहेत. वायू प्रदूषणात झालेल्या वाढीमुळे यासंबंधी मुंबईकरांनी अनेक तक्रारी मुंबई महापालिकेच्या वॉर्ड कार्यालयांकडे केल्या आहेत. मुंबईला वायू प्रदूषण, प्रदूषित पाण्याचे स्रोत अशा गंभीर समस्या हवामान बदलामुळे आणि अकार्यक्षम स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन प्रक्रियेमुळे भेडसावत आहेत, असे प्रजा फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद म्हस्के यांनी सांगितले.



चित्र : एआय

| समस्या | एकूण तक्रारी | | वाढ |
|---|---|---|---|
| | २०१५ | २०२४ | |
| मलनिःसारण | ९,९०४ | १५,७०१ | ५९ टक्के |
| उद्याने | १,३०७ | ३,२९३ | १५२ टक्के |
| पर्जन्य जलवाहिन्या | ८३० | २,३०४ | १७८ टक्के |
| सार्वजनिक शौचालये | १५९ | ५०५ | २१८ टक्के |

### घनकचऱ्याचा प्रश्न बिकट

शहरातील घनकचरा व्यवस्थापनाची घडी विस्कटू लागली आहे. महापालिकेकडे आलेल्या याविषयीच्या तक्रारींमध्ये सन २०१५च्या तुलनेत ३८० टक्के वाढ झाली आहे. शहरातील कचऱ्याची विल्हेवाट अजूनही देवनार आणि कांजुरमार्ग या दोनच डम्पिंग ग्राउंडवर लावली जाते. अलीकडेच मुंबई उच्च न्यायालयाने कांजुरमार्ग

### रस्त्यांच्या तक्रारींमध्ये घट

रस्त्यांच्या तक्रारींत सन २०१५च्या तुलनेत सन २०२४मध्ये घट झाली आहे. सन २०१५मध्ये या संदर्भात १३ हजार ५३९ तक्रारी पालिकेकडे आल्या होत्या. तर, सन २०२४मध्ये नऊ हजार ८०० तक्रारी आल्या आहेत. शाळांच्या दुरवस्थेबाबतही तक्रारींत ३० टक्क्यांनी वाढ आहे. तसेच, लायसन्स, इमारत कामे, पेस्ट कंट्रोल इत्यादीविषयीही तक्रारी आहेत.